## नियमीत दरखास्त क्र.९१/१९९१ मधील
## निशाणी क्र.९१ वर आदेश

**CNRNO.MHLA110000181991.**

०१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

०२. सदर अर्ज धनकोंनी हुकूमनाम्यामध्ये नमुद मिळकतीच्या हद्दी खुणा दाखविण्याकरिता मोजणी विभागातील अधिकाऱ्याची नेमणुक करण्याकरिता व पोलीस मदत मंजूर करण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जाला ऋणकोंनी म्हणणे दाखल करुन धनको हे सर्वे नं.४ ची संपूर्ण मोजणी करुन घेण्यास व हद्दी खुणा कायम करुन घेण्यास तयार असल्यास मोजणीबाबत आदेश पारीत करण्यास हरकत नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच त्या संयुक्त मोजणीमध्ये ऋणकोंच्या ताब्यामध्ये अतिरीक्त जमीन आढळुन आल्यास त्याचा कब्जा देण्यास ऋणको तयार असल्याचे कथन केलेले आहे. सदर प्रकरणात दाखल कागदपत्रावरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, सदर प्रकरणामध्ये नि.क्र.८८ नुसार कब्जे वॉरंट काढण्यात आलेले होते. सदर कब्जे वॉरंटच्या अहवालावरुन धनकोंनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट होते. तसेच नि.क्र.८८ सोबत दाखल अहवालावरुन देखील वादग्रस्त जमिनीच्या खाणा–खुना दिसुन आल्या नसल्यामुळे व ऋणकोंनी कब्जा देण्याबाबत वाद उपस्थित केल्यामुळे कब्जा देण्यास अडथळा निर्माण झाल्याचे दिसुन येते.

०३. सदर प्रकरणातील ऋणकोंतर्फे दाखल म्हणण्यावरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, सदर दरखास्त प्रकरण धनकोंनी नि.दि.दा.क्र.२२७/१९७९ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे हुकूमनामा अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयावर हुकूमनामा

ज्या प्रकारे आहे, त्याप्रकारे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे हुकूमनामा अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाला हुकूमनाम्याच्या बाहेर अथवा हुकूमनाम्याच्या पाठीमागे जाऊन आदेश पारीत करता येत नाही.

०४. सदर प्रकरणातील कागदपत्रावरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, ऋणकोंनी नि.क्र.७२ वरील आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र.९२७०/१९ ची याचिका दाखल केलेली होती. सदरची याचिका नामंजूर झालेली आहे. सदर प्रकरणातील कागदपत्रांवरुन स्पष्ट होते की, सदर दरखास्त प्ररकण सन १९९१ पासुन म्हणजेच २८ वर्षापेक्षा जास्ती कालावधीपासुन प्रलंबित आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील धनकोंना हुकूमनाम्यानुसार हुकूमनाम्याचे फळ लवकरात लवकर मिळणे आवश्यक आहे. सदर प्रकरणातील हुकूमनाम्याच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, हुकूमनाम्यासोबत नकाशा असुन सदर नकाशा हा हुकूमनाम्याचा भाग आहे. त्या नकाशामध्ये वादग्रस्त मिळकत दर्शविण्यात आलेली आहे. सदर हुकूमनाम्याद्वारे धनको हे वादग्रस्त मिळकतीचा कब्जा मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे ऋणकोंतर्फे दाखल म्हणण्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे पुन्हा संपूर्ण मिळकतीची मोजणी करण्याबाबत आदेश पारीत करणे न्यायोचित होणार नाही.

०५. सदर प्रकरणातील दाखल कागदपत्रावरुन व नि.क्र.८८ वरील कब्जा वॉरंटला दाखल अहवालावरुन माझे असे मत झाले आहे की, हुकूमनाम्यामध्ये नमुद वादग्रस्त मिळकतीच्या हद्दी खुणा दाखविण्याकरिता व मिळकतीचा कब्जा धनकोंना देण्याबाबत सहकार्य करण्याकरिता मोजणी विभागातील तज्ञाची म्हणजेच अधिकाऱ्याची नेमणुक करणे न्यायोचित होणार आहे. तसेच प्रकरणातील हुकूमनाम्याची लवकरात

लवकर अंमलबजावणी करण्याकरिता व अडथळा टाळण्याकरिता अर्जात व अहवालात नमुद केल्याप्रमाणे पोलीस मदत मंजूर करणे देखील न्यायोचित होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.९१ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रकरणातील हुकूमनामा म्हणजेच नि.दि.दा.क्र.२२७/१९७९ मधील हुकूमनाम्यामध्ये नमुद दावा मिळकतीच्या हद्दी खुणा दाखविण्याकरिता व त्या दावा मिळकतीचा कब्जा धनकोंना देण्यासाठी मदत करण्यासाठी उप–अधिक्षक, भुमि अभिलेख, निलंगा यांची नेमणुक करण्यात येत आहे.

३. उप–अधिक्षक, भुमि अभिलेख, निलंगा यांनी धनकोंकडुन नियमाप्रमाणे फी स्वीकारुन प्रकरणातील हुकूमनाम्यामध्ये नमुद मिळकतीच्या हद्दी खुणा दाखविण्याकरिता व त्या मिळकतीचा कब्जा धनकोंना देण्यासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांना मदत करावी.

४. धनकोंनी नियमाप्रमाणे आवश्यक फी संबंधीत कार्यालयाकडे भरावे.

५. तसेच पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, निलंगा यांना निर्देश देण्यात येते की, धनकोंकडुन नियमाप्रमाणे भत्ता स्वीकारुन हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता धनकोंना आवश्यक पोलीस मदत द्यावे.

६. अर्जात नमुद केल्याप्रमाणे पुन्हा कब्जे वॉरंट काढण्यात यावे व वर नमुद आदेशाबाबत संबंधितांना पत्राद्वारे कळवावे.

स्वा/–

दि. २०.११.२०१९.

(शिवकांत म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : M. N. Yenge
Name of the Court : Jt. C.J.S.D Court
(Shivkant M. Gourgond)
Date of Judgment/Order : 20.11.2019
Judgment/Order signed by presiding officer : 20.11.2019
Judgment/Order uploaded on : 21.11.2019